# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेसनोट क्रमांक २८१/२०२४** **दिनांक:- ३१/०७/२०२४.**

**“नालासोपारा पश्चिम निळेगाव येथे दोन पुरुष बांग्लादेशी नागरीक यांचेवर कारवाई करुन आरोपी यांना अटक करण्यात अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष नालासोपारा यांना यश”**

नालासोपारा पोलीस ठाण्याचे हद्दीत **रा. निळेगाव नालासोपारा प. ता.वसई जि.पालघर,** याठिकाणी परकीय नागरीक अनधिकृत पणे भारतात राहत असल्याची गोपनीय माहीती अनैतीक मानवी वाहतुक प्रतिबंध शाखेचे पोलीस निरीक्षक सौरभी पवार मॅडम यांना मिळाली असता सदर वेळी दोन लायक पंच यांना कार्यालयात बोलावुन घेवुन सदर परकीय नागरीकांवर नालासोपारा येथे जावुन कारवाई करण्याच्या सुचना देवून सदर बातमीची खातरजमा करुन पंच व पोलीस पथक असे जावून दि.२९/०७/२०२४ रोजी कारवाई करुन **निळेगाव नालासोपारा ता.वसई जि.पालघर,**येथील अनधिकृतपणे राहत असलेले बांग्लादेशी दोन पुरुष नागरीक यांना अटक करण्यात अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्षास यश आलेले आहे.

सदर बाबत थोडक्यात हकीकत अशी कि, **निळेगाव नालासोपारा ता.वसई जि.पालघर,** परीसरामध्ये अनधिकृतपणे वास्तव्य करीत असलेले परदेशी नागरीक यांच्या मिळालेल्या माहीतीच्या आधारे निळेगाव नालासोपारा प. येथे जावुन पंच व पथक असे सशंयीत आरोपीत राहत असलेल्या ठिकाणी गेलो असता सदर ठिकाणी सशंयीत दोन पुरुष मिळुन आल्याने त्यांना पोलीसांनी त्यांची ओळख करुन देवुन सदर पुरुष यांना त्यांचा नाव ,पत्ता व भारतीय नागरीकत्वाची कागदपत्रे विचारले असता विचारले असता त्यांनी त्यांची नावे **१) हन्नन यासीन शेख, वर्ष धंदा-चिकन दुकानात काम. रा. स्नेहा नगर सोसा. फेस-ए, दुकान नं ०२, अजमेरी चिकन सेंटर दुकानात,निलेगाव तलावासमोर,नालासोपारा प. ता-वसई ८१४९५७२३४४ मुळ रा- बाग पासरा पो.सोनाईमुर्जी तह-देवडी, जि-नोहाखाली बांग्लादेश २) शमीम मंडन शेख, रा-धंदा-चिकन दुकानात काम. रा. स्नेहा नगर सोसा. फेस-ए, दुकान नं ०२, अजमेरी चिकन सेंटर दुकानात, निलेगाव तलावासमोर,नालासोपारा प. ता-वसई ९३५६६३२२३८ मुळ रा-बाग पासरा पो.सोनाईमुर्जी तह-देवडी, जि-नोहाखाली बांग्लादेश देश बांग्लादेश, (आईचे नाव मनोआरा बेगम मंडन शेख मो.नं.०१३०९४७१७२१ देश-बांग्लादेश** असे सांगितले असून त्यांचेकडे त्यांचे भारतात येण्याकरीता व्हिझा पासपोर्ट नसून ते अनधिकृत पणे भारतात प्रवेश करुन येवुन अवैधरित्या वास्तव करीत असल्याचे कबुल केल्याने सदर दोन पुरुष बांग्लादेशी आरोपी यांचेवर नालासोपारा पोलीस ठाणे गु.रजि.नं.२७९/२०२४ भारतीय पासपोर्ट अधिनियम १९५० चे कलम ३(अ), ६(अ), सह विदेशी अधिनियम १९४६ चे कलम १४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई ही पोलीस उपआयुक्त श्री अविनाश अंबुरे (गुन्हे), सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री. बल्लाळ यांचे मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध शाखा नालासोपारा युनिटचे पोनि/सौरभी पवार व सफौ/९६००५ गवई, पोहवा/०५०२८ किणी, पोहवा/०७०५५ शेटये, पोहवा/१०००२ शिंदे, मपोहवा/०५००४ डोईफोडे, मपोहवा/०८००३ तिवले, मपोशि/१६०९५ पाटील सर्व नेम.अनै.मा.वा.प्र.कक्ष नालासोपारा यांनी उत्कृष्ठरित्या पार पाडली आहे.

--------oooo--------